प्रकरण पाचवे

प्रास्ताविक

या प्रकरणामध्ये रंगभूमी नियतकालिकात शेक्सपीअरच्या नाटकांसंबंधी जे विवेचनात्मक लेख व परीक्षणे आलेली आहेत, त्यांचा आढावा घ्यावयाचा आहे, रंगभूमी नियतकालिकाच्या जन्मापूर्वीच, शेक्सपीअरच्या प्रभावातून त्याच्या नाटकांची मराठीत भाषांतरे-रूपांतरे विपुल प्रमाणात झालेली होती. यापैकी काहींचे प्रयोगही बराच काळ चालू होते.

या प्रयोगांद्वारे नाट्यप्रेमी लोकांना शेक्सपीअर परिचयाचा झालेला होता. शेक्सपीअर मराठीत आणण्याची प्रक्रिया सुरू झाली त्याचे मूळ नवपरिचयातून निर्माण झालेल्या उत्साहात होते; परंतु विद्वान्, अभ्यासू व्यक्ती मात्र नावीन्याच्या आकर्षणातच गुरफटून न राहाता शेक्सपीअरच्या अभ्यासाकडे, चिंतनाकडे वळल्या असे दिसते. शेक्सपीअरच्या अभ्यासामुळेच, शोकान्तिकेचा (Tragedy) परिचय आपल्या विद्वानांना झाला. आणि थोरले माधवराव पेशवे हे वि. ज. कीर्तने यांचे मराठीतील पहिले शोकान्त नाटक १८६१ मध्ये अवतरले. या नाटकाच्या निमित्ताने १८६५ मध्ये शोकान्तिका या वाङ्मयप्रकाराची चर्चा केली गेली. वि. ज. कीर्तने यांनी थोरले माधवराव पेशवे या नाटकाचे परीक्षण ‘ शालापत्रका ’ त लिहिले. त्यात शोकान्तिकेची तरफदारी केलेली आहे. (‘ शालापत्रक ’ पु.५, अं.१, मे १८६५ पृ. ५/७) शोकान्त नाटक ही स्वाभाविक गोष्ट आहे. हा विचार १८६५ मध्ये व्यक्त झाला हे मराठी नाट्यसमीक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

१८८१ मध्ये ‘ केसरी ’ त गो. ग. आगरकर यांनी लिहिलेल्या ‘ शेक्सपीअर, भवभूती, कालिदास ’ या लेखाने शेक्सपीअरच्या मूल्यमापनाला नवीन दिशा मिळाली. १८८३ मध्ये गो. ग. आगरकर यांचे ‘ङ्गविकारविलसितङ्ग’ हे हॅम्लेटचे भाषांतर प्रसिद्ध झाले. त्या नाटकाच्या प्रस्तावनेत आगरकर यांनी शोकान्त नाटकाच्या संदर्भात आपले विचार व्यक्त केले. ‘ विकारविलसित ’ वर फेब्रु-ऑक्टो. १८८४ च्या ‘ विविधज्ञानविस्तारा’ त वि. सी. वागळे यांनी दोन लेखमाला लिहिल्या. जुलै १८९३ ते जाने १८८४ या काळात ‘ निबंध-

चंद्रिके ' त ह. ना. आपटे यांनी शेक्सपीअरवर लेख लिहिले. तसेच त्यांनी ' चित्रमयजगत् ' मध्ये १९१२ ते १९१८ या काळातही सहा लेख लिहिले. परंतु ते शेक्सपीअरच्या काव्यावरील होते.

' आनंदरस व करुणरसपर्यवसायी नाटकांतून चांगले कोणते ? ' या शीर्षकाचे एक निबंधवजा पत्र वामन विष्णु लेले यांनी प्रसिद्ध केले होते. हे पत्र, रोमिओ अँड ज्यूलिएट या शेक्सपीअरच्या नाटकाचे, नारायण बापूजी कानिटकर यांनी ' शशिकला व रत्नपाल ' या नावाने जे रूपान्तर केले होते त्याला अनुलक्षून होते. ही माहिती डॉ. रा. शं. वाळिंबे यांनी दिलेली आहे. त्याचप्रमाणे हॅम्लेटच्या व्यक्तिरेखेचे रहस्योद्ग्राही विवेचन प्रथम ' निबंधचंद्रिके ' च्याच ऑक्टो-नोव्हें. १८८३ च्या अंकात आलेले आहे असे सांगून डॉ. वाळिंबे म्हणतात, '' हा उपक्रम विद्वानांनी असाच नेटाने चालू ठेवला असता तर १८८३ ते १९०८ या पंचवीस वर्षांच्या दीर्घ काळात शेक्सपीअरच्या नाटकांवर विपुल प्रौढ समीक्षा तयार झाली असती. पण हे व्हावयाचे नव्हते. आपल्याकडील रसज्ञ विद्वान या काळात शेक्सपीअरच्या दिसेल त्या नाटकाचे प्रयोगासाठी रूपांतर करण्यात मग्न होते '' (मराठी नाट्यसमीक्षा १८६५ ते १९३५, पृ. १८८ डॉ. रा. शं. वाळिंबे)

१९०८ पासून रंगभूमी नियतकालिकात शेक्सपीअरवरील लेख येऊ लागले आणि पुन: नव्याने त्याच्या अभ्यासाला प्रारंभ झाला. विद्यापीठीय अभ्यासक्रमात संस्कृत नाटकांबरोबरच शेक्सपीअरची नाटकेही समाविष्ट होती. संस्कृत वाङ्मय ही आपलीच परंपरा, त्यामुळे त्यातून भारतीय संस्कृतीच्या खुणा जागोजागी पटत होत्या. त्यात अपरिचित, परके काही नव्हते. शेक्सपीअरचा अभ्यास म्हणजे, अपरिचित पाश्चात्य संस्कृतीच्या दर्शनाचा अभ्यास होता. पूर्णपणे वेगळ्या अशा जीवनमूल्यांचा अभ्यास होता. शेक्सपीअरच्या नाट्यकृतींतून भेदक वास्तवाचे उत्कट, भयावह, स्तिमित करणारे रंग पाहावयास मिळत होते. त्याच्या कलात्मक सौंदर्याचा आस्वाद घेणे, नवीन जीवनदर्शनाचा अर्थ समजावून घेणे हे अभ्यासकांना एक आव्हान होते. पौर्वात्य साहित्यशास्त्रीय संकल्पना येथे उपयोगी पडण्यासारख्या नव्हत्या. या साहित्यकृतींच्या मूल्यमापनासाठी त्याच भूमीतील समीक्षासिद्धान्त स्वीकारणे आवश्यक होते. म्हणजे हा अभ्यास पाश्चात्य साहित्य व पाश्चात्य समीक्षातत्त्वे या दोन्हीचा होता. यामुळेच मराठी साहित्यसमीक्षेत संस्कृत बरोबरच इंग्रजी समीक्षासिद्धांतांचा नवा प्रवाह मिसळून जाण्यास सुरुवात झाली. हा परिणाम मराठी नाट्यसमीक्षेच्या संदर्भात लक्षात घेण्याजोगा आहे.

रंगभूमी नियतकालिकात, शेक्सपीअरच्या नाट्यकृतींवर झालेले विवेचन हे स्थूल परिचयात्मक, विशिष्ट नाट्यकृतीच्या संदर्भात एखाद्याच नाट्यपैलूचा विचार मांडणारे असे आहे. ती सर्वांगीण, तत्त्वचिंतनात्मक समीक्षा नाही. पण स्वतंत्र दृष्टीने शेक्सपीअरच्या नाटकांचा विचार करून, काही मते व्यक्त केली आहेत हे त्याचे महत्त्व आहे.

पाश्चात्य रंगभूमी, नट, नाटककार, नाटके यासंबंधीचे छोटे मोठे लेख, पाश्चात्य नटांची त्रोटक माहिती, शेक्सपीअरच्या नाटकांची व त्यांच्या मराठी रूपांतरांची यादी इत्यादी प्रकारचे लेखन या नियतकालिकात आलेले आहे. त्यापैकी खालील लेखांचा आढावा येथे घ्यावयाचा आहे. यातील चार परीक्षणलेख आहेत आणि एक शोकरसपूर्ण नाटकांचे विवेचन करणारा लेख आहे.